**रे.मु.क्र. ८१/२०२३**
**नि.क्र. १२/क लगत**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १ आशिष माखनलाल गडेकर यांचा सरतपास वादीचे वकिल श्रीमती.प्रमिला भाइंगडे यांच्यातर्फे शपथेवर सुरू</u>**

१५. प्रकरणामध्ये प्रतिवादी भारत याने कर्ज मिळण्यासाठी दिलेला मुळ अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर तत्कालीन शाखा व्यवस्थापकांची सही आहे. सदर दस्त मुळ दस्त असल्याने त्यास **निशाणी क्र.१५** देण्यात येतो. तसेच प्रकरणामध्ये प्रतिवादीच्या असेट व लायेबिलीटी संबंधी दस्त दाखल केला आहे. सदर दस्त मुळ दस्त असल्याने त्यास **निशाणी क्र. १६** देण्यात येतो. तसेच कर्जाची रक्कम प्रतिवादीस मिळाल्याबाबत पोच पावती प्रकरणात दाखल आहे. त्यावर प्रतिवादी यांची सही आहे. सदर दस्त मुळ दस्त असल्याने त्यास **निशाणी क्र.१७** देण्यात येतो. तसेच प्रतिवादीने लिहुन दिलेला करार प्रकरणात दाखल आहे. त्यावर प्रतिवादीची सही आहे. सदर दस्त मुळ दस्त असल्याने त्यास **निशाणी क्र.१८** देण्यात येतो. तसेच प्रतिवादी क्र. २ याने करून दिलेला गॅरंटी करार प्रकरणात दाखल आहे. त्यावर प्रतिवादी क्र. २ ची सही आहे. सदर दस्त मुळ दस्त असल्याने त्यास **निशाणी क्र.१९** देण्यात येतो. तसेच गॅरेंटर यांनी दिलेल्या डिक्लेरेशनची प्रत प्रकरणात दाखल केली आहे. सदर दस्त मुळ दस्त असल्याने त्यास **निशाणी क्र.२०** देण्यात येतो. तसेच जमानतदाराने व प्रतिवादी क्र. १ याने दिलेल्या अंडरटेकिंगच्या प्रती प्रकरणात दाखल आहेत. सदर दस्त मुळ दस्त असल्याने त्यास अनुक्रमे **निशाणी क्र.२१ ते २३** देण्यात येतो. तसेच प्रकरणात लोन रिव्ह्यु फॉरमॅट दाखल केला आहे. सदर दस्त मुळ दस्त असल्याने त्यास **निशाणी क्र.२४** देण्यात येतो. तसेच Acknowledgement of debt and security संबंधी दस्त दाखल केला आहे. सदर दस्त मुळ दस्त असल्याने त्यास **निशाणी क्र.२५** देण्यात येतो. तसेच प्रतिवादींना वकिलांमार्फत नोटीस पाठवली होती. त्या नोटीसची

स्थळप्रत प्रकरणात दाखल आहे. करीता सदर नोटीसच्या स्थळप्रतीला **निशाणी क्र.२६** देण्यात येतो. तसेच मी प्रकरणामध्ये प्रतिवादीच्या खात्याचा खाते उतारा व बँकर्स बुक्स ऑफ इव्हीडन्स ॲक्ट प्रमाणेचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर खाते उताऱ्यावर माझी सही व बँकेचा शिक्का असून मजकुर बरोबर आहे. करीता सदर खाते उताऱ्यास **निशाणी क्र. २७** व प्रमाणपत्रांना **निशाणी क्र. २८ ते ३०** देण्यात येतो.

सरतपास पुर्ण.

**प्रकरण एकतर्फा चालवण्यात येत असल्याने उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

उरण, (एस.पी. वानखडे)

दिनांक – ०५/०५/२०२६ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण